घटकांचं पुरेसं ज्ञान मिळावं म्हणून त्यांच्यासाठी प्रशिक्षण शिबीर घ्यायचा मानस आहे. समीक्षकांच्या प्रतिसादाविषयी मात्र मी साशंक आहे. उपद्रव मूल्याविषयी बोलायचं झालं तर माणसाला त्याला अपेक्षित असं योग्य मूल्य मिळत नाही तेव्हा त्याला उपद्रव मूल्य वापरायचा मोह होतो.

रंगकर्मींना हे सांगताना मला समीक्षकांनाही काही गोष्टी सुचवाव्याशा वाटतात. तुमच्या टीकेपेक्षाही तुम्ही रोष ओढवून घेता ते जेव्हा तुमच्या लिखाणाची भाषा ही अपमानास्पद आणि टिंगल टवाळीची असते तेव्हा. कष्ट करुन उभारलेल्या निर्मितीची टिंगल टवाळी करुन तुम्ही काय साधता ? टीका जरुर करा. ती परखड असू दे. पण त्यात टिंगल टवाळी नको. दुसरी एक महत्वाची गोष्ट मला सुचवावीशी वाटते. समीक्षकांनी समीक्षण लिहिण्यापूर्वी संबंधितांशी संपर्क साधून आपल्या शंकांचं निराकरण करुन घ्यायचा प्रयत्न करावा. हे कधी कुणी करीत नाही. समीक्षकांना त्याची गरज वाटत नाही. परिणामी समीक्षणाचं स्वरुप एकांगी होतं. समतोल परीक्षणासाठी असा संपर्क आवश्यक आहे असं मला वाटतं. समीक्षा ही रंगकर्मींना आणि प्रेक्षकांना मार्गदर्शक ठरली तरच तिचा हेतू साध्य होऊन ती रंगभूमीला उपकारक ठरेल. यासाठी समीक्षक आणि रंगकर्मी यांचे संबंध मैत्रीपूर्ण असायला हवेत. एकमेकांविषयी विश्वास आणि आदराची भावना असायला हवी. रंगभूमीच्या व्यवहारात समीक्षा आणि समीक्षक यांना योग्य ते स्थान मिळणं ही रंगभूमीची गरज आहे.

कलावंतांसाठी आचारसंहिता असावी अशी मागणी वारंवार केली जाते. कलावंतांसाठीच का? सर्व घटकांसाठी आचार संहिता असावी असं मला वाटतं. परंतु लिखित आचारसंहिता शेवटी कागदावरच रहाते. आचारसंहितेची स्वत:लाच गरज वाटणं व ती निष्ठेनं पाळणं हे वृत्तीत असावं लागतं. मा. दत्ताराम, डॉ. श्रीराम लागू, दिलीप प्रभावळकर यासारख्या कलावंतांवर कुणी लादली होती आचारसंहिता? भालचंद्र पेंढारकरांसारख्या निर्मात्यावर कुणी बंधनं घातली होती आचारसंहितेची? आचारसंहिता ही ज्यानं त्यानं आपल्या रंगभूमीवरच्या निष्ठेनं पाळावयाची गोष्ट आहे. नियम लादून करायची गोष्ट नाही. कलावंतांनी अलिखित आचारसंहिता कसोशीनं पाळावी हे निश्चित. पण त्याचबरोबर कलावंतांकडून आचार संहिता पाळण्याची अपेक्षा करणाऱ्या प्रेक्षकांना एक प्रश्न विचारावासा वाटतो. नाटक चालू असताना आपले पेजर, मोबाईल बंद ठेवावेत, किंवा नाटक पहाताना बाजूच्या